फोटो ओळी : पणजी : गोमंतकीय गजलकार प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांच्या झेलून दुःथ माझे गेला खचून रस्ता या गजलसंग्रहाचे प्रकाशन करताना कवी आणि आमदार विष्णू सूर्या वाघ. बाजूस संजय मिसर, प्रकाश क्षीरसागर, गोरख मांद्रेकर, ए. के. शेख, अनिल सामंत आणि सौ. चित्रा क्षीरसागर.

हळुवार मनाचा हुंकार म्हणजे गजल : ए. के. शेख

प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांच्या झेलून दुःख माझे गेला खचून रस्ता या  गजलसंग्रहाचे प्रकाशन

पणजी, ता. १५, गजलेतील दोन ओळींचा प्रत्येक ही स्वतंत्र कविता असते. कवी आपल्या कवितेत आपल्याला हवा तो शब्द वापरू शकतो परंतु गजलेमध्ये तिच्या मागणीनुसार गजलकाराला शब्द पेरावे लागतात. गजल लिहिण्यासाठी साधनेची आवश्यकता असते. गजलेत हळुवारपणा आवश्यक असतो. त्यासाठी हळुवार मन असावे लागते या हळुवार मनाचा हुंकार म्हणजेच गजल, असे उद्‌गार ज्येष्ठ गजलकार ए. के. शेख यांनी काढले.  दुःखाची बिजे मनात रुजू लागली की तिचे गजलेत रूपांतर होते. गजल म्हणजे प्रियकर आणि प्रेयसी यांनी केलेल्या कानगोष्टी. इतकी ती नाजूक असते. प्रेयसी जसे आपल्या मनातील गोष्टी फक्त प्रियकराला कळाव्यात यासाठी ती त्याच्या कानातच आपले मनोगत सांगते. तशी गजल ही तरल मनातून तरल शब्दांतून प्रकटते, असे त्यांनी सांगितले.
इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझाच्या परिषद कक्षात गोमंतकीय गजलकार, साहित्यिक व पत्रकार प्रकाश रामचंद्र क्षीरसागर यांच्या पहिल्या गजलसंग्रहाचे प्रकाशन केल्यानंतर ते बोलत होते. गोव्यातून प्रसिद्ध झालेला हा संपूर्ण गजलांचा एकमेव व पहिला गजलसंग्रह असल्याने त्यांच्या या गजलसंग्रहाचे रसिकांनी स्वागत करायला हवे, असे आवाहन श्री. शेख यांनी यावेळी केले.  माधव राघव प्रकाशन ताळगाव आणि इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता.
या संग्रहातील प्रत्येक गजल ही रसिकांच्या मनाला भिडणारी आहे. त्यातील काही शेर उद्‌धृत करून शेख यांनी आपल्या या मताची पुष्टी केली. श्री. क्षीरसागर यांनी गजललेखनासाठी सागर हा तखल्लुस म्हणजे स्वतःची साममुद्रा घेतली आहे. ती कशी सार्थ आहे, हे शेख यांनी सांगताना गोव्यातील दर्या अर्थात सागर, क्षीरसागर यांच्या नावातील सागर आणि त्यांच्या पत्नीने त्यांना प्रथम कवी सागर असेच संबोधले होते, असे स्पष्टीकरणासह सांगितले.
गोव्याच्या भूमीतील ही गजल आता मराठीच्या मुख्य प्रवाहाशी नाते सांगेल. श्री. क्षीरसागरांच्या प्रत्येक गजलेत दुःखाचे दर्शन सुखदरीत्या होते. त्यांनी आजवर लिहिलेल्या कविता मी प्रसंगानुरुप वाचल्या परंतु त्यांच्या या संग्रहाच्या अवलोकनाने त्यांच्यातील परिपक्व कवी आणि अनुभवाशी प्रामाणिकता व या गजलातील काव्यमयता दिसून आली, अशा शब्दात प्रा. अनिल सामंत यांनी श्री. क्षीरसागर यांचा गौरव केला. या एकशेपाच गजलांतील प्रत्येक गजलेत ह्दयाला भिडणारा शेर आढळतो. रसिकांनी संपूर्ण संग्रह निश्‍चितच वाचला पाहिजे, असे श्री. सामंत म्हणाले.
या कवीच्या गजला या इथल्या मातीशी इमान राखणाऱ्या आहेत. पावसाचा बेहिशोबीपणा आणि त्याच्या लहरीमुळे शेतकऱ्यांची होणारी होरपळ काही गजलांतून त्यांनी व्यक्त केली आहे. शेतकरी कर्जाच्या गाळात रुततो आहे आणि त्याच्यावर आत्महत्येचीही पाळी येत आहे, या प्रखर भावना प्रकट करणारी ही वेगळ्या वाटेची गजल आहे, असे उद्‌गार प्रसिद्ध गोमंतकीय कवी, आमदार विष्णू सूर्या वाघ यांनी काढले. गोमंतकातील मातीचा वास या गजलांतून येतो. दुःख हे प्रत्येकाच्या वाट्याला येत असते. परंतु त्या दुःखाचीह गजल करता येते, असेही श्री. वाघ म्हणाले.
माधव राघव प्रकाशनच्या प्रमुख सौ. चित्रा क्षीरसागर यांनी प्रास्ताविकात या संग्रहाच्या निर्मितीची कथा सांगितली. मनाची उद्विगनता झाल्यावर गजलकार सागर यांनी गजलेतून हे दुःख मांडले त्यामुळे त्यांच्या  मनाला कशी स्वस्थता लाभली, याचे विवेचन सौ. क्षीरसागर यांनी केले. आपल्यातील व्यथा, वेदनांनी संवेदनशील मनाला हेलावून टाकले. ती व्यथा शब्द बनून कागदावर उतरली. या भावनांना गजलेच्या रूपानेच प्रकट व्हावेसे वाटले. केंद्रीय साहित्य अकादमी (दिल्ली) आणि कला अकादमी यांनी घेतलेल्या कार्यशाळेत गजलेचा आकृतीबंध मनावर ठसला. त्यामुळे या गजलसंग्रहातील गजल प्रकट झाल्या. माधव सटवाणी आणि मोहन कुलकर्णी यांनी आपल्या गजलांवर संस्कार केले. प्रत्येक गजलेची इस्लाह कुलकर्णी यांनी चिकित्सक भावनेतून केली, त्यामुळे या निर्दोष रचना आपण लिहू शकलो, अशी कृतज्ञता श्री. क्षीरसागर यांनी व्यक्त केली.  मोहनराव कुलकर्णी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझाचे सदस्यसचिव गोरख मांद्रेकर यांनीही आपले विचार प्रकट केले. भारतीय आयुर्विमा महामंडळाचे शाखा व्यवस्थापक संजय मिसर यांनी सुरेख सूत्रसंचालन केले. अनेक गजलांतील तसेच प्रस्तुत झेलून दुःख माझे गेला खचून रस्ता या संग्रहातील अनेक शेर समयसूचकतेने त्यांनी नजाकतीने पेश करून कार्यक्रम रंगतदार घडविला.